महाराष्ट्र शासन

**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

(लेखा शाखा)

**ई-मेल:-** dcg.aurangabad@gmail.com **दूरध्वनी क्र** 0240-2351311

---

## जाहीर सुचना

जा.क्र २०२५/साप्र/लेखा-४/ पाणी जार /प्र.क. दिनांक :९/०४/२०२५.

**विषय : विभागीय आयुक्त कार्यालयात फिल्टर पिण्याचे पाणी जार पुरवठा करणेकरीता दरपत्रके मागविणे बाबत.**

विभागीय आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय इमारतीतील पहिला, दुसरा व तिसरा मजला येथे अभ्यांगतासाठी पिण्याच्या पाण्याचे Water Dispenser वर ठेवण्यासाठी शुध्द (Filter) पाण्याचे जार पुरवठा करणे आवश्यक आहे.

खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने सेवापुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ,क्र | बाब | दरदिवशी /दरमहिना /वार्षिक अंदाजे आवश्यक नग | प्रति नग दर (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | शुध्द (Filter) पाणी जार | १०/२००/२४०० | |

- **खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.**

१ दरपत्रकधारकाची / निविदाधारकाची माहितीबाबतचे विवरण पत्र सोबत संलग्न केले आहे.

२ दुकाने व संस्था अधिनियम 1947 अन्वये शॉप ॲक्ट लाइसन्स / संस्थेचे /आस्थापना /नोंदणी प्रमाणपत्राची अद्यावत प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

३ आधार कार्डची छायांकित प्रत.

४ पॅन कार्डची छायांकित प्रत

५ GST वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्राची (Certificate of Registration) छायांकित प्रत

६ सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत व काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे निविदा / दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र/हमीपत्र, सोबत संलग्न केले आहे

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ०६ ही सर्व कागदपत्रे स्वयंसाक्षांकित ( self attested ) करुन तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सर्व परवान्यांचे दरपत्रकाच्या कालावधीपर्यंत नुतनीकरण असणे आवश्यक राहील. वरीलपैकी सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती दरपत्रक उघडतेवेळी, सोबत ठेवणे व कोणत्याही कागदपत्राच्या मुळ प्रतीची मागणी या कार्यालयाकडून कोणत्याही वेळी करण्यात आल्यास, त्या सादर करणे बंधनकारक राहील.

### १. निविदा / दरपत्रकाबाबत आवश्यक अटी व शर्ती

१. एक निविदाधारक /दरपत्रकधारक यांनी एकच निविदा/दरपत्रक भरणे आवश्यक असून त्यांना एकापेक्षा अधिक निविदा/दरपत्रके एका नावाने किंवा वेगवेगळया नावांने सादर करण्यास प्रतिबंध आहे .

२. विहीत मुदतीनंतर प्राप्त निविदा / दरपत्रके स्विकारली जाणार नाही अथवा त्यावर विचार केला जाणार नाही.

३. पिण्याचे पाणी जार बाबत शुध्द करुन कसे पुरवठा करणार या बाबत सेवापुरवठादार यांनी विवरण नमुद करावे.

४. निविदा / दरपत्रकाचा तांत्रिक लिफाफा सुरवातीस उघडण्यात येईल. तपासणीअंती लिफाफ्यात आवश्यक असणा-या नमुद कागदपत्रांची पुर्तता करण्या-या, पात्र निविदाधारकांची पुढील निविदा प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल. व लिफाफ्यात पात्र दरपत्रधारकांचाच कमीत कमी एल-१ दराचा विचार करण्यात येईल.

५. या अटी व शर्ती मध्ये नवीन अटी व शर्तीचा समावेश करणे, अटी व शर्ती कमी करणे, तसेच परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त कार्यालयाने राखुन ठेवले आहेत.

६. कोणतेही दरपत्रक/निविदा, प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

७. ज्या दरपत्रकधारकाचा दर अंतिम झाल्यानंतर, त्यांना सोबतच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा रु.५००/- च्या बॉंडवर आदेशाच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

८. सदर निविदेचा कालावधी एक वर्षाचा राहील. तथापि आवश्यकता असल्यास मुदतवाढ देण्यात येईल.

९. निविदा/ दरपत्रकधारकाची माहितीबाबतचा नमुना सोबत संलग्न केला आहे

आपल्याकडील दरपत्रके वरील कागदपत्रासह या कार्यालयास दिनांक-९/०४/२०२५ ते १५/०४/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा पर्यंत या कार्यालयाचे लेखाशाखेमध्ये सादर करावेत. उशिरा प्राप्त झालेल्या किंवा अपूर्ण दरपत्रके यांचा विचार करण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी विहीत दिनांकास व विहीत वेळेपर्यंत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक-१६/०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वा अपर आयुक्त (साप्र) विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे कक्षामध्ये सर्व उपस्थितांसमक्ष उघडण्यात येतील.

**(मा. अपर आयुक्त (साप्र) यांच्या टिपणी मान्यतेने)**

**(अरुण पावडे)** ८/४/२०२५

**प्र.तहसीलदार (सा.प्र)**
**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर, विभाग.**

## दरपत्रक मंजूर झाल्यानंतर करारनामा करुन दयावयाच्या अटी व शर्ती

1. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या इमारतीत पिण्याचे पाणी जार पुरवठा करणेकरीता दिनांक- २०/०४/२०२५ ते १९/०४/२०२६ या कालावधीकरीता किंवा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष अंमलात राहतील. शक्य झाल्यास सदर करारास शासन नियमानुसार आवश्यक असल्यात मुदतवाढ देण्यात येईल. तथापि मुदतवाढ कालावधी मध्ये स्वीकृत दरानेच भाडे आकारणी करण्यात येईल. सदरची मुदतवाढ स्वीकारणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच सेवापुरवठादारास जर दरकराराच्या समाप्तीच्या कालावधीपुर्वी इमारतीत पिण्याचे पाणी जार पुरवठा करणे बंद करावयाचे असल्यास दोन महिने आगाऊ कार्यालयास सुचित करणे आवश्यक राहील.
2. दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती यांचे पालन इमारतीत पिण्याचे पाणी जार पुरवठा करणा-या व्यक्ती अथवा संस्था यांचेवर बंधनकारक राहील. पिण्याचे पाणी जार पुरवठा करणा-या व्यक्ती अथवा संस्था यांची कुठलीही अट अथवा शर्त या कार्यालयावर लादता येणार नाही.
3. पिण्याचे पाणी जार पुरवठा परवाना असणे आवश्यक राहील.
4. Water Dispenser वरील पिण्याचे पाण्याचा जार ठेवण्याची जागा रोजच्या रोज स्वच्छ करुन पिण्याचे पाण्याचे जार लावणे बंधनकारक राहील.
5. पिण्याचे जारच्या पाण्याची टीडीएस पातळी गुणवत्ता पुर्ण ठेवणे व याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची संपूर्ण जबाबदारी जार पुरवठादाराची राहील.
6. पिण्याचे जारच्या पाण्याचे आकस्मितरीत्या नमुने घेतले जाऊ शकतील व आरोग्य विभागाच्या प्रयोग शाळेत पाठवून, तपासणी करून घेतले जाऊ शकतील पिण्याचे पाणी TDS पातळी गुणवत्तेनुसार आढळून न आल्यास, आवश्यकता वाटेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याबाबत कुठलीही सबब ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
7. जार पुरवठा करणारे कर्मचारी यांची किमान वयोमर्यादा १८ पेक्षा जास्त असावी. तसेच त्यांचे राहणीमान निटनेटके व स्वच्छ असावे, शक्य झाल्यास जार टाकतांना हातमोजे ( disposable) चा वापर करण्यात यावा.
8. जार पुरवठा करणारे कर्मचारी वैद्यकीय दुष्ट्या तंदुरस्त, निरोगी असणे आवश्यक आहे. नियुक्त कामगारांना कोणतेही संसर्गजन्य रोग होणार नाही याची दक्षता जार पुरवठाधारकास घ्यावी लागेल.
9. जार पुरवठा करणारे नियुक्त कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी, कामगार कल्याण निधी, सामुहिक विमा, ई.एस.आय.सी, व्यवसाय कर, आय कर, उपदान (ग्रच्युइटी), सानुग्रह अनुदान, बोनस, पगारी रजा, सुट्या व इतर आर्थिक देणेबाबतची संपूर्ण जबाबदारी जार पुरवठादाराची राहील, याबाबत या कार्यालयाची काहीही जबाबदारी राहणार नाही.
10. कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७०, महाराष्ट्र कंत्राटी कामगार नियम १९७१, व इतर सर्व कामगार/औद्योगिक कायद्याचे पालन करण्याची व त्यानुसार आवश्यक ते अभिलेखे विहित नमुन्यात ठेवण्याची व विवरणपत्रे इत्यादीबाबत वेळेचे वेळी पूर्तता करण्याची जबाबदारी जार पुरवठाधारकाची राहील.
11. जार पुरवठा करणारे नियुक्त कर्मचारी यांची नाव, कायमचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक व फोटो सहित यादी या कार्यालयास सादर करावी लागेल.
12. कार्यालयातील किंवा कार्यालयीन परिसरातील कोणत्याही सामानाची चोरी, लपवालपवी होणार नाही हे पाहणे जार पुरवठाधारकाची जबाबदारी राहील.
13. निविदाधारकाने नियुक्त केलेल्या कामगार/कर्मचारी यांचेकडून गैरवर्तन अथवा कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास जार पुरवठाधारक यांचेकडुन नुकसान भरपाई घेण्यात येईल.
14. न्यायालयीन प्रक्रियेसाठी कार्यक्षेत्र छत्रपती संभाजीनगर हे राहील.

खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार हमीपत्र आस्थापनेच्या /संस्थेच्या लेटरहेडवर देण्यात यावे.

**एकच दरपत्रक सादर करत असलेबाबत, निविदाधारकांचे कंपनीस /संस्थेस यांनी काळया यादीत टाकलेले नाही, कागदपत्रांच्या सत्यतेबाबत, ई-निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र / हमीपत्र**

विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाच्या इमारतीत पिण्याचे पाणी जार पुरवठा करणेकरीता मी दरपत्रक दाखल करीत असून खालील प्रमाणे हमी देत आहे.

मी एकापेक्षा अधिक संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक नाही, असल्यास मी ज्या संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक आहे त्यासंस्थेपैकी एकाच संस्थेमार्फत मी एकच दरपत्रक सादर करीत आहे.

तसेच माझ्या कंपनीस/संस्थेस राज्य तसेच केंद्र शासकीय/निमशासकीय/ पिण्याचे पाणी पुरवठादारांच्या काळ्या यादीत टाकलेले नाही असे मी प्रमाणित करीत आहे.

मला पूर्ण कल्पना आहे की, मी सादर केलेले दरपत्रक मंजूर झाल्यास कार्यालयात पुरवठा करण्यात येणा-या मी पिण्याचे पाणी पातळी TDS गुणवत्तेनुसार पुरवठा करेन व या कामाकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ साधन सामग्री उपलब्ध ठेवेल. मला याबाबत पुर्ण कल्पना आहे की, मी माझ्या कामात कोणत्याही प्रकारची कसूर /दिरंगाई अथवा हजलगर्जीपणा झाल्यास विभागीय आयुक्त कार्यालय निश्चित करतील अशा दंडास अथवा कायदेशीर शिक्षेस मी पात्र राहीन. माझे फर्मने उक्त निविदेच्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे व माहिती खोटी आढळल्यास भारतीय न्याय दंड संहितेतील संबंधित कलमान्वये मी शिक्षेस पात्र राहील. तसेच मी सादर केलेली निविदा अवैध ठरेल याची मला जाणीव आहे.

मी निविदेतील अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या आहेत. सदर अटी व शर्ती मला मान्य असून त्यांच्या अधिन राहून मी सदर दरपत्रक सादर करीत आहे.

वरील सर्व माहिती खरी व सत्य असून यामध्ये काही असत्यता आढळून आल्यास माझी कंपनी/संस्था ही दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहीन हे मला मान्य आहे.

स्थळ :

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

दिनांक :

नाव : ------------------------------

पत्ता : ------------------------------

------------------------------.

भ्रमणध्वनी क्र. ----------------------

## विभागीय आयुक्त कार्यालयाच्या इमारतीत पिण्याचे पाणी जार पुरवठा करणेबाबत दरपत्रकधारकाची माहिती बाबतचे विवरण

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | निविदा /दरपत्रकधारकाचे आस्थापना / संस्थेचे नाव व पत्ता | |
| २. | निविदा /दरपत्रकधारका चे पुर्ण नाव व ह. रहिवासी पत्ता | |
| ३. | आस्थापना पुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक मोबाईल क्रमांक व ईमेल | |
| ४. | शॉपअॅक्ट लायसन्स/आस्थापना/ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. | |
| ५. | आधारकार्ड क्रमांक (छायांकित प्रत सोबत जोडणे) | |
| ६. | पॅन कार्ड क्रमांक (छायांकित प्रत सोबत जोडणे) | |
| ७. | सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबात व काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, पिण्याचे पाणी पातळी TDS गुणवत्तेनुसार पुरवठा प्रतिज्ञापत्र | |

स्थळ

निविदा / दरपत्रकधारकाची सही व शिक्का

दिनांक-